। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १११ वा । गुरूवार दिनांक १६ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची भरपाई द्या. खासदार ओमराजे निंबाळकर यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठाम मागणी



धाराशिव (प्रतिनिधी)– खरीप २०२५ हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत तांत्रिक त्रुटीमुळे वगळण्यात आलेल्या धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांचा तातडीने समावेश करून पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मंजूर करण्यात यावा, अशी ठाम मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात राज्य तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या अहवालात संबंधित तांत्रिक त्रुटी स्पष्टपणे नमूद करण्यात आल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

राज्य शासनानेही ही बाब मान्य करून विमा कंपन्यांना पात्र शेतकऱ्यांना सात दिवसांच्या आत पीक विम्याची रक्कम अदा करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांतील हजारो शेतकरी अद्यापही या लाभापासून वंचित असल्याची बाब खासदार निंबाळकर यांनी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव ग्रामीण, आंबेजवळगा, पाडोळी, जेवळी, धानोरी, माकणी, अनाळा, शेलगाव, जवळा, पाचपिंपळा, सोनारी, आसू, शिराढोण व वाशी; सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, खांडवी, आगळगाव, पांगरी, सुरडी, पानगाव, वैराग, नारी, उपळे दुमाला, सौंदरे व गौडगाव; तसेच लातूर जिल्ह्यातील कासारसिरशी, कासरबालकुंदा, भूतमुगळी, मदनसुरी, मातोळा, किन्नीथोट, किल्लारी, उजनी, लामजना व औसा या महसूल मंडळांचा तातडीने प्रधानमंत्री पीक विमा योजनेत समावेश करून पात्र शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि तांत्रिक कारणांमुळे कोणताही पात्र शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहू नये, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका खासदार ओमराजे निंबाळकर यांनी मांडली.

यापुढेही धाराशिव लोकसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, अशी ग्वाही खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दिली.

## क्राईम न्युज

### खड्ड्यात मोटारसायकल जावुन झाला मयत

येरमाळा (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, गणेश संजय शिंदे, रा. बावी ता. वाशी जि. धाराशिव व सोबत मयत नामे–संजय आण्णासाहेब भातलवंडे, वय ४५ वर्षे, रा.दहिफळ ता. कळंब जि. धाराशिव हे दोघे दि.२०.०६.२०२६ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान सापनाई गावाकडून हायवेकडेजाणारे रोडवर स्नेहा बिअरबारचे पुढे आरोपी नामे गणेश शिंदे यानी त्याचे ताब्यातील मोटरसायकल हायगईने व निष्काळजीपणे चालवून रोडचे कडेला असलेल्या खड्यात मोटरसायकल जावून अपघात झाला. या अपघातात संजय भातलवंडे हे गंभीर जखमी होवून उपचार दरम्यान मयत झाले. तर गणेश शिंदे किरकोळ जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे आदेश संतोष भातलवंडे, वय २५ वर्षे, रा. दहिफळ ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१३.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१), २८१ सह मोवाका कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कारची मोटारसायकला धडक एका महिलेचा मृत्यू

तुळजापूर (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बाळासाहेब निळकंठ कोळी, वय २५ वर्षे, रा. नांदुर्गा ता. औसा जि. लातुर ह.मु. पदमशाली धर्मशाळेच्या बाजूस लातुर रोड तुळजापूर ता. तुळजापुर जि. धाराशिव व सोबत स्वप्नाजी उर्फ जिजाबाई संदीप आकोसकर, वय २९ वर्षे, रा. कोळेवाडी ता. जि. धाराशिव, ह.मु. हडको तुळजापूर हे दोघे दि.१२.०७.२०२६ रोजी . मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान पवार वॉशिंग सेंटर समोर लातुर रोड तुळजापूर येथे इर्टीगा गाडी क्र एमएच चा चालकाने त्याचे ताब्यातील इर्टीगा गाडी ही हायगईने व निष्काळजीपणे चुकीच्या दिशेने चालवून बाळासाहेब कोळी यांचे मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात स्वप्नाली उर्फ जिजाबाई आकोसकर या गंभीर जखमी होवून दरम्यान मयत झाल्या. तर बाळासाहेब कोळी किरकोळ जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–बाळासाहेब कोळी यांनी दि.१३.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे ये गुन्हा नोंदवला आहे

## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणासाठी '१९५०' टोल फ्री हेल्पलाईन कार्यान्वित नागरिकांनी सुविधेचा लाभ घ्यावा

धाराशिव,दि.१४ जुलै (जिमाका) भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू असून,या मोहिमेदरम्यान पात्र मतदारांना निवडणूकविषयक सेवा अधिक सुलभ व प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनाने जिल्हास्तरावर विशेष मदत कक्ष (Help Desk) स्थापन केला आहे.

तसेच मतदारांच्या अडचणी,शंका आणि तक्रारींच्या तातडीने निवारणासाठी '१९५०' हा टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून,जिल्ह्यातील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या मदत कक्षामार्फत मतदारांना विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे संपूर्ण वेळापत्रक,मतदार म्हणून पात्रता,नाव नोंदणी अथवा दुरुस्तीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.तसेच मागील विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतील (२००२, २००४ व २००५) मतदार नोंदी शोधून देण्यासाठीही सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

याशिवाय,मतदारांना गणना प्रपत्र (Enumeration Form) ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीने भरताना आवश्यक ते मार्गदर्शन व मदत केली जाणार आहे.स्थलांतरित मतदारांना त्यांचा सध्याचा आणि पूर्वीचा विधानसभा मतदारसंघ ओळखून योग्य ठिकाणी नावनोंदणी करण्यासाठीही मदत करण्यात येणार आहे.

मतदारांना निवडणूक आयोगाच्या 'एउखपर्शी' या मोबाईल पची माहिती देण्याबरोबरच त्यामधील 'Book a Call with BLO' या विशेष सुविधेबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे.या सुविधेद्वारे संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याशी थेट संपर्क साधून आवश्यक माहिती व सहाय्य मिळविता येणार आहे.

'१९५०' या टोल फ्री क्रमांकावर मतदारांना विनामूल्य संपर्क साधून आपल्या शंका व अडचणींचे निरसन करता येणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम जिल्ह्यात युद्धपातळीवर सुरू असून, या प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही अडचणीसाठी नागरिकांनी '१९५०' हेल्पलाईन तसेच जिल्हास्तरीय मदत कक्षाचा उपयोग करावा,असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाने केले आहे.

## मधुमक्षिकापालन योजनेचा लाभ घ्या ; पात्र लाभार्थ्यांकडून प्रस्ताव मागविले: ५० टक्के अनुदानासह शासनाच्या हमीभावाने मध खरेदीची सुविधा



धाराशिव, (जिमाका) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मध केंद्र योजना (मधुमक्षिकापालन) ही योजना १८ जून २०१९ पासून राज्यभर राबविण्यात येत असून,या योजनेअंतर्गत पात्र व्यक्ती तसेच संस्थांकडून लाभासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. शेतकरी, युवक,युवती तसेच संस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रभरून जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी के.जे.सय्यद यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण,साहित्य स्वरूपात ५० टक्के अनुदान व ५० टक्के स्वगुंतवणुकीच्या तत्त्वावर आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले जाते.तसेच शासनाच्या हमीभावाने मध खरेदी, विशेष व छंद प्रशिक्षणाची सुविधा,मधमाशांचे संरक्षण व संवर्धनाबाबत जनजागृती तसेच मध व्यवसायासंदर्भातील विविध तांत्रिक मार्गदर्शनही करण्यात येते.

वैयक्तिक मधपाळ घटकासाठी अर्जदार साक्षर असणे आवश्यक असून, स्वतःची शेती असल्यास प्राधान्य दिले जाईल.अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे.

केंद्रचालक (प्रगतीशील मधपाळ) घटकासाठी संबंधित व्यक्ती किमान दहावी उत्तीर्ण असावी.तिचे वय २१ वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.संबंधित व्यक्तीच्या किंवा तिच्या कुटुंबातील सदस्याच्या नावावर किमान एक एकर शेती अथवा भाडेतत्त्वावर घेतलेली शेती असावी.तसेच लाभार्थ्याकडे मधमाशा पालन,प्रजनन व मध उत्पादनाबाबत इतरांना प्रशिक्षण देण्याची क्षमता आणि आवश्यक सुविधा असणे बंधनकारक आहे.

केंद्रचालक संस्था घटकासाठी संबंधित संस्था नोंदणीकृत असावी. संस्थेच्या नावावर किंवा भाडेतत्त्वावर किमान एक हजार चौरस फूट क्षेत्रफळाची सुयोग्य इमारत उपलब्ध असावी.तसेच मधमाशा पालन, प्रजनन आणि मध उत्पादन विषयक प्रशिक्षण देण्याची क्षमता संस्थेकडे असणे आवश्यक आहे.

## उमरग्याच्या लेकींचा दिल्लीत जलवा; जिल्ह्याला मिळवून दिला प्रथम क्रमांकाचा मान

उमरगा (प्रतिनिधी)–नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धा मालिका–४ आणि द्वितीय राष्ट्रीय लाठी फेडरेशन चषक स्पर्धेत उमरगा येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत सहा सुवर्ण आणि सहा कांस्यपदकांची कमाई केली. या यशाच्या जोरावर धाराशिव जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची मानाची ट्रॉफी मिळवून देत विद्यार्थिनींनी जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवला.

दि. ११ व १२ जुलै रोजी झालेल्या या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांतील नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला होता. १६ वर्षांखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात जिल्हा परिषद प्रशालेच्या अस्मिता भोसले, आनंदी कांबळे, सृष्टी सूर्यवंशी, गीता गायकवाड, शिवदर्शन शिंदे आणि महेश्वरी पालमपल्ले यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदके पटकावली. तसेच इतर विद्यार्थिनींनी कांस्यपदके जिंकून संघाच्या यशात मोलाचे योगदान दिले.

उमरगा जिल्हा परिषद प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील यशाची परंपरा कायम राखली आहे. यापूर्वी तमिळनाडूतील सेलम येथे झालेल्या सहाव्या राष्ट्रीय लाठी अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपद मिळविले होते. तसेच बुलढाणा येथे झालेल्या राज्यस्तरीय तेंग सुडो शालेय क्रीडा स्पर्धेत चार सुवर्ण, चार रौप्य आणि सहा कांस्यपदकांची कमाई केली होती. या यशामागे क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख आणि धनराज तेलंग यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण, कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, सभापती ड. आकांक्षा चौगुले, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर, शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुजाता मोरे यांच्यासह शिक्षक, क्रीडाप्रेमींनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

सुवर्णपदक विजेत्या खेळाडू : लाठी क्रीडा प्रकारात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात अस्मिता भोसले, आनंदी कांबळे, सृष्टी सूर्यवंशी, गीता गायकवाड, शिवदर्शन शिंदे आणि महेश्वरी पालमपल्ले यांनी सुवर्णपदक पटकावले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे धाराशिव जिल्ह्याला राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला.

## श्री अन्न क्रांतीतूनच आरोग्य,रोजगार अन् समृद्धी:भरडधान्य पीक लागवड व मूल्यवर्धन कार्यशाळेत कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)– श्री अन्नातून आरोग्य, रोजगार आणि समृद्धी मिळवणे सहज शक्य आहे. त्यासाठी संशोधक, प्रक्रिया उद्योजक आणि विस्तार कार्यकर्त्यांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. श्री अन्न क्रांतीतूनच ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळेल आणि आरोग्यदायी भारताची निर्मिती होईल, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा यांनी केले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी) अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र (तुळजापूर) आणि मिलूप फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (बार्शी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''भरडधान्य पीक लागवड आणि मूल्यवर्धन'' या क्षमता बांधणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते ऑनलाइन बोलत होते. व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, सोलापूर रब्बी ज्वार संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. परशुराम पात्रोटी, राजीव जैन, मिलूप फूड्सचे शंतनू पाटील आणि केव्हीकेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. सचिन सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांनी मराठवाड्यात भरडधान्याचे लागवड क्षेत्र कमी असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. हे क्षेत्र वाढवण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी ''आत्मा'' आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाची मदत घेऊन सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. प्रक्रिया आणि बाजारपेठेतील संधींवर प्रकाश कार्यशाळेत शास्त्रज्ञ डॉ. परशुराम पात्रोटी यांनी 'भरडधान्य उत्पादन प्रक्रिया व मूल्यवर्धनातील अद्ययावत प्रगती' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करत प्राथमिक व दुय्यम संयंत्रांची माहिती दिली. मिलूप फूड्सचे शंतनू पाटील यांनी भरडधान्य प्रक्रियेतील औद्योगिक संधींवर, तर राजीव जैन यांनी या उत्पादनांना बाजारपेठेत असणाऱ्या संधींविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ११५ शेतकऱ्यांना 'मिलेट किट'चे वाटप कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. सचिन सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात केव्हीकेतर्फे शेतकरी, युवक आणि महिलांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षणांची माहिती दिली व शेतकऱ्यांना याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यशाळेला जिल्ह्यातील ११५ शेतकरी बांधव व भगिनी उपस्थित होत्या. सर्व उपस्थित शेतकऱ्यांना 'श्री अन्न (मिलेट) किट'द्वारे बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. वर्षा मरवाळीकर यांनी केले. कृषिभूषण पुरस्कारप्राप्त महेश जमाले यांचा विशेष सत्कार कसबे तडवळा येथील प्रगतशील शेतकरी श्री. महेश जमाले यांना महाराष्ट्र शासनाचा मानाचा 'कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार २०२३' मिळाल्याबद्दल कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी २४ जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

धाराशिव,दि.१४ जुलै (जिमाका) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या), जिल्हा कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.इच्छुक विद्यार्थ्यांनी २४ जुलैपर्यंत अर्ज सादर करावेत,असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत इयत्ता दहावी, बारावी,पदवी,पदव्युत्तर,वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातींतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे.संबंधित विद्यार्थ्यांनी सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले असावेत.उपलब्ध निधीच्या अधीन राहून तसेच ज्येष्ठता व गुणक्रमानुसार पात्र विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे.

अर्जासोबत स्वहस्ताक्षरातील अर्ज, मोबाईल क्रमांक,शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका,पुढील वर्षात प्रवेश घेतल्याचा पुरावा अथवा प्रवेश शुल्काची पावती,आधार कार्ड, जातीचा दाखला आदी आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

पूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,तळमजला,धाराशिव येथील कार्यालयात २४ जुलैपर्यंत कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष जमा करावीत किंवा टपालाद्वारे पाठवावीत.निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील मांग,मातंग समाज तसेच तत्सम १२ पोटजातींतील पात्र युवा व युवतींनी या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या), धाराशिवचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## श्री तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेसाठी ऑगस्ट महिन्याचे ऑनलाइन नोंदणी वेळापत्रक जाहीर

धाराशिव,दि.१४ जुलै (जिमाका) महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश,कर्नाटक, तेलंगणा आणि इतर राज्यांतील भाविक मोठ्या संख्येने तुळजापूर येथे येत असतात.कुलदेवतेचे दर्शन, कुलाचार आणि कुलधर्म पार पाडण्यासाठी भाविकांची वर्षभर मोठी गर्दी होत असते.या पार्श्वभूमीवर ऑगस्ट २०२६ महिन्यातील श्री तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेसाठी ऑनलाइन नोंदणीचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, भाविकांनी त्यानुसार नोंदणी करावी, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने केले आहे.

श्री देवींची सिंहासन पूजा अत्यंत महत्त्वाची मानली जाते.या पूजेची नोंदणी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर र्हीींिं://पश्रळपश. ्हीळीींश्रक्षरलहर्रींरपळ.ेीस या संकेतस्थळाद्वारे ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाविक,महंत,पुजारी,सेवेकरी तसेच नागरिकांनी याची नोंद घ्यावी,असेही संस्थानतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

ऑगस्ट २०२६ महिन्यातील सिंहासन पूजेसाठी ऑनलाइन नोंदणी १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार असून २४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहेत.भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावर प्रवेश करून आपली नोंदणी पूर्ण करावी.

यानंतर २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाइन ड्रॉ पद्धतीने प्रथम सोडत काढण्यात येईल.निवड झालेल्या भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस पाठविण्यात येतील. प्रथम सोडतीतील भाविकांनी २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजतापासून ते २८ जुलै रोजी सकाळी १० वाजेपर्यंत ऑनलाइन शुल्क भरावे.

प्रथम फेरीत सिंहासनांची संख्या पूर्ण न झाल्यास २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत द्वितीय ऑनलाइन सोडत काढण्यात येईल. निवड झालेल्या भाविकांना एसएमएसद्वारे माहिती देण्यात येईल.द्वितीय सोडतीतील भाविकांनी २८ जुलै रोजी सकाळी ११ ते २९ जुलै रोजी सकाळी १० वाजेपर्यंत ऑनलाइन पेमेंट करावे.

प्रथम आणि द्वितीय फेरीतही सिंहासनांची संख्या पूर्ण न झाल्यास तृतीय ऑनलाइन सोडत काढण्यात येईल.या सोडतीसाठी २९ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत भाविकांना एसएमएस पाठविण्यात येतील. तृतीय सोडतीतील भाविकांनी २९ जुलै रोजी सकाळी ११ ते ३० जुलै रोजी सकाळी १० वाजेपर्यंत ऑनलाइन पेमेंट करावे.

ऑगस्ट २०२६ महिन्यातील सिंहासन पूजेचे अंतिम बुकिंग पूर्ण झालेल्या भाविकांची यादी ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

भाविकांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करून सिंहासन पूजेचा लाभ घ्यावा,असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूरचे व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजकारणात उलथा-पालथाची शक्यता

राज्या बरोबर केंद्र सरकारमध्ये मंत्रीमंडळातील खाते बदल, काहीना डच्चू तर काहींचा नव्याचे पदार्पन होणार असल्याच्या हालचालीस वेग आला आहे. राज्यात शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पॉवरफुल्ल होताना दिसून येत आहेत. त्यांचे राजकिय वजन वाढत आहे. त्यांनी उद्धव ठाकरे यांचे सहा खासदार आपल्यापक्षात वळविण्यात यश मिळविता आले आहे हे तसे पाहिले तर मोठे यश आहे. ही एक मोठी किमया आहे. जे इतर कोणीही केले नसते ते सामार्थ्य एकनाथ शिंदे यांनी बोलून नाही तर करून दाखविले आहे. आज राज्यातील आमदार फुटणार अशी चर्चा आहे ती चुकीची नाही, फुटणार मात्र ते एकनाथ शिंदे यांच्याकडे जाणार असे निश्चित समजले जाते. याचा फायदा एकनाथ शिंदे यांनाच होणार, त्यांचे राजकिय वजन आणखीन वाढणार आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. एकनाथ शिंदे यांचे वजन केंद्रात वाढत आहे. ना. अमित शहा यांची जवळीकता वाढत आहे. त्यामुळे तर्क-वितर्कव्यक्त केले जात आहेत. राज्यात अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून काही तरी खलबत्ते चालू असल्याचे दिसून येत आहे. राजकारणात काही बाबी लबाड असतात हे काही चुकीचे नाही. त्यामुळे विश्वासर्हता कमी असते तरी याबाबीकडे कानडोळा करून चालणार नाही. मुळात राज्यात काही दिवसाने राजकिय भुकंप होणार असल्याचे भाकित केले जाते. त्याच प्रमाणे राज्यात राजकारणातील चाणक्य समजले जाणारे शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची भेट घेतली. कोणी कोणाची कारण नसताना भेटत नाही. भाजपाला किंबहुन अमित शहा यांना जो उद्धव ठाकरे यांना राजकिय त्रास दिला. जी भाजपाची नामुष्की झाली या बाबत भाजपा विचार करणार हे निश्चित! मुळात थेट एनडीएमध्ये प्रवेश दिला जात नसला तरी जे भाजपाचे मित्रपक्ष आहेत, त्यांच्या मार्फत प्रवेश दिला जातो. हे भाजपाने आखलेले गणित चुकीचे ठरणारे नाही. मुळात एकनाथराव शिंदे यांच्या पक्षात आले म्हणजे ते रालोआमध्ये आले असे समजले जाते. याचा परिणाम कोणत्याही परिस्थितीत भाजपाची ताकद वाढविणे हा उद्देश दिसून येतो. राजकारणात अनेक बाबी उघड होत नसतात. उद्धव ठाकरे यांची मोठी चुक अवधानाने झाली म्हणजे ते काँग्रेस सोबत जावुन मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. वास्तविक त्यांच्याएवजी इतर कोणालाही मुख्यमंत्रीपद दिले असते तर ते योग्य होते. मुळात राजकारणात एकाला लक्ष्य करावयाचे झाले तर ते ठरवुन होते. एकनाथराव शिंदे यांना ना. अमित शहा यांचा भक्कम पाठींबा आहे. तसे त्यांचा एनडीएमधील दोन नंबरचा पक्ष गणला जात आहे. यामुळे अर्थात एकनाथराव शिंदे वजन राजकिय दृष्ट्या वाढलेले आहे हे लक्षात येते. राजकारणातील अनेक अशा बाबी आहेत की, जे अंतिम सत्य नसते त्यामुळे जे चलती चाल आहे, यावर नागरिक विश्वास ठेवतात. आज भाजपासोबत जाऊन चारशेपारचा आकडा पार करावयाचा तो साध्य होताना दिसून येत आहे. आज देशात काँग्रेसला उतरती कळा लागली आहे हे काही केले तरी मान्यच केले पाहिजे. आता परत उभारी घेणे मोठे आवघड आहे. तरी विरोधीपक्ष नेताम्हणून काँग्रेसकडे पाहिले जाते. जी विरोधीपक्ष नेतेपद म्हणून दमदार कामगिरी आवश्यक आहे ती दिसून येत नाही. राज्यात सध्याला राष्ट्रवादीत अस्थितरता दिसून येत आहे. अजित पवार नंतर जी पक्षाची मजबुत दोरी असावयास पाहिजे ती दिसून येत नाही. अजित पवार यांच्या मृत्यू बाबत संशयाचे जे वारे वाहात होते तेही शांत झाले आहे. राजकारणात कधी काय होईल व कधी काय चमत्कार घडेल हे सांगता येत नाही. जसे एकनाथ शिंदे यांना भाजपाचा भक्कम पाठींबा होता म्हणून त्यांची योजना यशस्वी झाली. उद्धव ठाकरे यांचे सहा खासदार फुटले गेले यांना देखिल काही तरी मजबुत असा शब्द दिला गेला असेल. त्यामुळे राज्यात एकनाथ शिंदे यांना कॅबिनेट व केंद्रात दोन मंत्रीपद लाभणार आहे हे काही उगीच हवेत गप्पा नसाव्यात. हे सत्यात असेल त्यामुळे ऑपरेशन टायगर यशस्वी झाले. सध्याला टीएमसी म्हणजे ममता बॅनर्जी यांची स्थिती बिकट आहे. जे हाल ममता बॅनर्जींचे राजकिय दृष्टया दिसून येत आहेत तेच उद्धव ठाकरे यांचे होताना दिसून येत आहेत. राज्यात सर्वाधिक मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ भोगणारे तिसरे मुख्यमंत्री फडणवीस आहेत. आडीच वर्ष सत्तास्थापनेस होत असून यानंतर काही तरी राज्यात घडेल असे चित्र दिसून येत आहे. राज्यात धनंजय मुंडे यांची वर्णी लागणार असेही बोलले जात आहे. याच अर्थ राज्यात काही तरी घडेल अशी स्थिती निर्माण होताना दिसून येत आहे. एकनाथ शिंदे यांना परत राज्याचे मुख्यपद मिळू शकेल. अनेक विविधपक्ष एकत्र येवू शकतील किंवा इतर पक्ष-गटाचे मिलन होवू शकेल असेच चिन्ह सध्याला दिसून येत आहेत. ऑपरेशन टायगर हे एक आव्हान होते. त्यांना दिलेला शब्द पाळणे त्यापेक्षाही मोठे आव्हान आहे हे लक्षात घेतले पाहिजे. जशी देशात काँग्रेसची स्थिती, त्यापेक्षाही ममता बॅनर्जी यांची स्थिती, तशीच परिस्थिती उद्धव ठाकरे यांच्या पक्षावर येणार का? हीच चर्चा रंगताना दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील राजकिय वारे कोणत्या दिशेने वाहाणार हे कळून येत नसले तरी अंदाजानुसार राजकिय भुकंपाची स्थिती मजबुत दिसत आहे. यशस्वी आडीच वर्षाचा काळ त्यात ऑपरेशन टायगर यशस्वी, सर्व अधिवेशनाची यशस्वी सांगता या बाबीमुळे विरोधकांची ताकद अतिषय कमी होताना दिसून येत आहे. विरोधकच नसतील असे चित्र मुंबई व दिल्लीत दिसून येत असेल तर ते लोकशाहीसाठी किती सदृढ असेल याचा विचार आता नागरिकांनी केला पाहिजे. ज्या चुका विरोधीपक्षकडून किंवा ठाकरे यांच्याकडून घडल्या, त्याचा परिणाम आज दिसून येत आहे. २०२४ ला जी चुक झाली तीचा परिणाम आज काही पक्षाला भोगावा लागत आहे. काही पक्षाचे अस्तित्वच धोक्यात दिसून येत आहे. संपेल की काय असे वाटत आहे. राष्ट्रवादीतील हालचाली, ठाकरे गटातील काही द्विधा मनस्थितीत असणारे आमदार याबाबीचा विचार केला तर लवकरच राजकिय भुकंपाचे संकेत आहेत.



# सृष्टीच्या सौंदर्याचा सर्वोच्च आविष्कार: स्त्री

**चेहरा नसे आरसा,**
**चारित्र्याचा दीप असे,**
**अखंड नंदादीपापरी,**
**तिचे चैतन्य हे वसे.**
**न बाह्य रंगात,**
**न तात्पुरत्या त्या रंगात,**
**तिचे सौंदर्य पाहावे,**
**तिच्या कर्तृत्व-तरंगात!**

स्त्री म्हणजे केवळ एक रूप नाही, तर ती सृष्टीच्या निर्मितीची, त्यागाची आणि प्रेमाची साक्षात मूर्ती आहे. तिच्या अस्तित्वाशिवाय निसर्गाचे सौंदर्य आणि मानवी जीवनाची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. ती एकाच वेळी कोमल आणि कणखर असते. स्त्री ही केवळ घराची नाही, तर संपूर्ण समाजाची आणि संस्कृतीची पाया आहे. तिचा सन्मान करणे आणि तिचे सक्षमीकरण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

देवाने जर सौंदर्याला देह दिला असेल, तर त्याचे नाव ''स्त्री'' आहे; आणि त्या सौंदर्याला आत्मा दिला असेल, तर त्याचे नाव मातृत्व, करुणा, प्रेम आणि त्याग आहे. युगानयुगांपासून मानवी मनाला भुरळ घालणारी स्त्रीची सुंदरता केवळ बाह्य रूपाच्या चौकटीत बंदिस्त करणारी नाही. ती सौंदर्यशास्त्र, संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञान आणि मानवी मूल्यांचा एक असा त्रिवेणी संगम आहे, जो काळानुरूप बदलला तरी त्याचे मूळ तेज कधीही ओसरत नाही.

स्त्रीची सुंदरता ही केवळ तिच्या चेहऱ्यात नसते, तर ती तिच्या नजरेतील करुणेत, हास्यातील निरागसतेत, चालण्यातल्या लयीत आणि बोलण्यातल्या माधुर्यांत असते. रूप हे काळाच्या ओघात बदलणारे एक अस्थिर वास्तव आहे, पण तिच्या व्यक्तिमत्त्वाचे सौंदर्य काळालाही हरवणारे असते. सुंदर ती नाही जी फक्त डोळ्यांना भुरळ घालते; सुंदर ती आहे, जिचे अस्तित्व मनाला शांत करते, कतृत्वाची प्रेरणा देते आणि विचारांना समृद्ध करते.

निसर्गाच्या विशाल पटलावर पाहिले तर स्त्रीचे सौंदर्य आणि कतृत्व अनेक छटांनी नटलेले दिसते. ती कधी पहाटेच्या पहिल्या कोवळ्या किरणांसारखी आश्वासक असते, तर कधी पावसाच्या पहिल्या सरींसारखी तप्त धरणीला तृप्त करणारी असते. तिचे हास्य म्हणजे चंद्राची शीतलता, तर तिचा स्वभाव म्हणजे नदिला वाहते ठेवणारा ओलावा. तिची सहनशीलता ही पृथ्वीच्या विशालतेसारखी आहे, जी सर्व दुःखांना आपल्या कुशीत सामावून घेते.

भारतीय पुराणांतून सौंदर्याची एक वेगळी व्याख्या समोर येते. सीता म्हणजे संयमाचे सौंदर्य, तर राधा म्हणजे प्रेमाची पराकाष्ठा. रुक्मिणीमध्ये श्रद्धा दिसते, तर द्रौपदीमध्ये स्वाभिमानाचे धारदार रूप दिसते. पार्वतीची तपश्चर्या हे सौंदर्याचे सर्वोच्च टोक आहे, तर लक्ष्मी ही मंगलतेचे प्रतीक आहे. अगदी अलीकडे इतिहासाच्या पानांत डोकावले तर राणी पद्मिनीचे रूप आणि स्वाभिमान, राजमाता जिजाऊंचे मातृत्वाचे तेज, अहिल्याबाई होळकरांचे कर्तृत्व आणि राणी लक्ष्मीबाईंच्या धैर्याचे सौंदर्य हे सर्व स्त्रीच्या अष्टपैलू व्यक्तित्वाचे द्योतक आहे. सौंदर्याचे हे मोजमाप रूपावरून नाही, तर ध्येयावरून आणि त्यागावरून ठरते.

**– राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

सौंदर्याचा हा प्रवास जागतिक स्तरावरही तितकाच व्यापक आहे. ''हेलन ऑफ ट्रॉय'' हिचे रूप युद्धाचे कारण बनले, पण मानवी लालसा आणि सौंदर्य यातील द्वंद्व आजही संशोधनाचा विषय आहे. ''मोना लिसा'' चे ते गूढ स्मित शतकानुशतके जगाला मोहूनटाकतेय, कारण त्या स्मितहास्यामागे एक अथांग बुद्धिमत्ता दडलेली आहे. ऑड्रे हेपबर्नने म्हटल्याप्रमाणे, '' स्त्रीचे खरे सौंदर्य तिच्या आत्म्यातून प्रतिबिंबित होते.''; हे आत्मसौंदर्यच तिला आजच्या काळात अंतराळवीर, वैज्ञानिक, सैनिक, उद्योजिका किंवा न्यायाधीश म्हणून अधिक उठून दिसण्यास मदत करते. आजच्या स्त्रीच्या सौंदर्याचे मोजमाप कॉस्मेटिक्सवर नाही, तर तिच्या आत्मविश्वासावर अवलंबून आहे.

सोशल मीडियाच्या या युगात फिल्टर्सचा वापर करून चेहरा सुंदर बनवणे सोपे झाले आहे, पण ते केवळ तात्पुरते आकर्षण आहे. खरा ''आरसा'' तर चारित्र्याचा असतो. फुलाला स्वतःचा सुगंध कोणालाही सांगावा लागत नाही, तो जसा नैसर्गिक असतो, तसेच स्त्रीचे संस्कारसौंदर्य तिच्या वागण्यातून आपोआप दरवळत असते. तिचे मातृत्व ही एक अशी ताकद आहे जी निसर्गाच्या कोणत्याही निर्मितीपेक्षा श्रेष्ठ आहे.

अखेरीस, स्त्रीच्या सौंदर्याचे परिमाण शोधताना हेच उमजते की, तिचे रूप हे एका दिवसाच्या फुलासारखे नसून ते एका नंदादीपासारखे आहे, जो सतत तेवत राहून प्रकाश देत असतो. तिच्या डोळ्यांतील करुणा, स्वभावातील साधेपणा आणि व्यक्तिमत्त्वातील निष्ठेचे तेज हेच सौंदर्याचे खरे परिमाण आहे. रूप डोळ्यांना भुरळ घालते, पण मनाचे सौंदर्य आयुष्याला अर्थ देते. म्हणूनच, सौंदर्याचा खरा मुकुट चेहऱ्यावर नसून तो चारित्र्यावर, विचारांवर आणि कर्तृत्वावर असतो. स्त्री म्हणजे केवळ सृष्टीची निर्मिती नाही, तर ती सौंदर्याचा असा एक अविष्कार आहे, जो शतकानुशतके मानवी सभ्यतेला उजळत आणि समृद्ध करत आला आहे.

**देवाने फुलांना दिले रंग,**
**चंद्राला शीतलता,**
**नदीला दिला प्रवाह,**
**अन् सृष्टीला ती सुचिता.**
**रूप हे ऋतूसारखे,**
**क्षणात विरून जाईल,**
**पण तिचे आत्मतेज,**
**युगायुगांत उरत राहील.**

# थोडंसं दुखलं की लगेच पेनकिलर घेता?




डोकेदुखी, अंगदुखी, कंबरदुखी किंवा दातदुखी झाली की अनेकजण डॉक्टरांचा सल्ला न घेता लगेच पेनकिलरची गोळी घेतात. वेदना काही वेळात कमी होत असल्यामुळे ही सवय अनेकांना लागते. मात्र, तज्ज्ञांच्या मते वारंवार किंवा गरज नसताना पेनकिलर घेणे शरीरासाठी धोकादायक ठरू शकते. या औषधांमुळे वेदना तात्पुरत्या कमी होतात, पण आजाराचे मूळ कारण दूर होत नाही. उलट दीर्घकाळ पेनकिलरचा वापर केल्यास किडनी, यकृत, पोट आणि हृदयावर गंभीर परिणाम होऊ शकतात.

तज्ज्ञ सांगतात की, कोणतीही वेदनाशामक औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय नियमितपणे घेऊ नयेत. विशेषतः वेदना वारंवार होत असतील किंवा दीर्घकाळ टिकत असतील, तर त्यामागील कारण शोधणे अधिक महत्त्वाचे आहे.

वारंवार पेनकिलर घेतल्याने सर्वात मोठा परिणाम किडनीवर होऊ शकतो. विशेषतः इबुप्रोफेन, डायक्लोफेनॅक आणि नेप्रोक्सेनसारख्या NS-IDs गटातील औषधांचा दीर्घकाळ वापर केल्यास किडनीकडे जाणारा रक्तपुरवठा कमी होऊ शकतो. त्यामुळे किडनीवर ताण येतो आणि तिची कार्यक्षमता हळूहळू कमी होऊ शकते. ज्या व्यक्तींना आधीपासून मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा किडनीचा आजार आहे, त्यांनी अधिक काळजी घ्यावी. पेनकिलरचा अति वापर पोटासाठीही हानिकारक ठरू शकतो. या औषधांमुळे पोटाच्या आतील आवरणाला इजा होण्याचा धोका असतो. त्यामुळे ॲसिडिटी, छातीत जळजळ, गॅस, पोटातील अल्सर किंवा गंभीर परिस्थितीत अंतर्गत रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. रिकाम्या पोटी पेनकिलर घेणे किंवा दीर्घकाळ त्यांचा वापर करणे अधिक धोकादायक ठरू शकते.

# महिलांमध्ये वजन वाढण्यामागचे खरं कारण काय?



अनेकांना असे वाटते की वजन वाढण्यामागे फक्त जास्त खाणे किंवा व्यायामाचा अभाव हीच कारणे असतात. ही कारणे महत्त्वाची असली तरी प्रत्येक वेळी तीच जबाबदार असतात असे नाही. विशेषतः महिलांमध्ये वजन वाढण्यामागे हार्मोन्सचे असंतुलन हेही एक मोठे कारण असू शकते. शरीरातील हार्मोन्स भूक, चयापचय (मेटाबॉलिझम), ऊर्जा, चरबी साठवण्याची प्रक्रिया आणि प्रजनन आरोग्य नियंत्रित करतात. त्यामुळे हार्मोन्समध्ये बदल झाल्यास वजन झपाट्याने वाढू शकते.

हार्मोन्स हे शरीरातील रासायनिक संदेशवाहक असतात. ते अंतःस्रावी ग्रंथींमधून तयार होतात आणि रक्ताद्वारे शरीराच्या विविध भागांपर्यंत पोहोचतात. ऊर्जा कशी वापरली जाईल, भूक कधी लागेल, झोप, तणाव, मनःस्थिती आणि प्रजनन यांसारख्या अनेक महत्त्वाच्या प्रक्रिया हार्मोन्स नियंत्रित करतात. त्यामुळे हार्मोन्सचे संतुलन बिघडल्यास त्याचा थेट परिणाम वजनावर होतो.

जेव्हा शरीर एखादा हार्मोन आवश्यकतेपेक्षा जास्त किंवा कमी प्रमाणात तयार करू लागते, तेव्हा त्याला हार्मोनल असंतुलन म्हणतात. या स्थितीत आहार आणि व्यायामात कोणताही बदल नसतानाही शरीरात विशेषतः पोटाभोवती चरबी साठू लागते.

वजन वाढण्यामागे काही महत्त्वाचे हार्मोन्स कारणीभूत ठरू शकतात. त्यामध्ये सर्वप्रथम इन्सुलिनचा समावेश होतो. इन्सुलिन रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करते. शरीरात इन्सुलिन रेसिस्टन्स निर्माण झाल्यास अतिरिक्त चरबी साठू लागते आणि वजन वाढते.

थायरॉईड हार्मोनदेखील वजन नियंत्रित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. थायरॉईडचे प्रमाण कमी झाल्यास शरीराचा मेटाबॉलिझम मंदावतो. त्यामुळे शरीर कमी ऊर्जा वापरते आणि वजन वाढण्याची शक्यता वाढते.

कॉर्टिसोलला 'स्ट्रेस हार्मोन' असेही म्हटले जाते. दीर्घकाळ ताणतणाव असल्यास या हार्मोनची पातळी वाढते. त्यामुळे वारंवार भूक लागणे, गोड किंवा जास्त कॅलरी असलेले पदार्थ खाण्याची इच्छा वाढणे आणि विशेषतः पोटाभोवती चरबी साठणे अशी समस्या निर्माण होऊ शकते. एस्ट्रोजेन हा महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा हार्मोन आहे. तो शरीरात चरबीचे वितरण नियंत्रित करतो. पीसीओएस, रजोनिवृत्ती (मेनोपॉज) किंवा इतर हार्मोनल बदलांमुळे एस्ट्रोजेनचे प्रमाण बदलल्यास वजन वाढू शकते.


लेप्टिन आणि ग्रेलिन हे दोन हार्मोन्स भूक आणि पोट भरल्याची भावना नियंत्रित करतात. या हार्मोन्सचे संतुलन बिघडल्यास वारंवार भूक लागते आणि गरजेपेक्षा जास्त अन्न खाल्ले जाते.

हार्मोनल असंतुलनामुळे वजन वाढत असल्यास काही ठरावीक लक्षणे दिसू शकतात. कोणतेही स्पष्ट कारण नसताना अचानक वजन वाढणे, पोटाभोवती चरबी साचणे, सतत थकवा जाणवणे, मासिक पाळी अनियमित होणे, वारंवार भूक लागणे, वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करूनही वजन न घटणे, सतत मूड बदलणे, चिडचिड होणे, केस गळणे किंवा पातळ होणे, चेहऱ्यावर मुरूम येणे, त्वचेमध्ये बदल होणे आणि झोपेच्या समस्या निर्माण होणे ही हार्मोनल असंतुलनाची सामान्य लक्षणे असू शकतात.

महिलांच्या आयुष्यात पौगंडावस्था, गर्भधारणा आणि रजोनिवृत्ती या काळात हार्मोन्समध्ये नैसर्गिक बदल होतात. मात्र, त्याशिवाय सततचा ताण, काही औषधांचा वापर, स्टेरॉइड्सचे अति सेवन किंवा काही वैद्यकीय समस्या यांमुळेही हार्मोन्सचे संतुलन बिघडू शकते.

अशा परिस्थितीत वजन वाढण्याकडे दुर्लक्ष करू नये. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, तणाव नियंत्रण आणि वेळेवर वैद्यकीय तपासणी यामुळे हार्मोन्सचे संतुलन राखण्यास मदत होऊ शकते. जर वजन अचानक वाढत असेल किंवा वरील लक्षणे दिसत असतील, तर स्वतः उपचार करण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेऊन आवश्यक तपासण्या करून घेणे अधिक योग्य ठरते.

एकूणच, महिलांमध्ये वजन वाढण्यामागे केवळ चुकीची जीवनशैलीच नाही, तर हार्मोन्सचे असंतुलनही महत्त्वाची भूमिका बजावू शकते. त्यामुळे योग्य वेळी कारण ओळखून उपचार केल्यास वजन नियंत्रणात ठेवणे आणि एकूण आरोग्य चांगले राखणे शक्य होते.



# विलासराव देशमुख फाउंडेशनकडून महिलांसाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात

*ट्वेंटी वन ॲग्रो लि.संचालिका सौ.अदितीताई अमित देशमुख यांच्या हस्ते प्रभाग ८ मध्ये केंद्राचा शुभारंभ*



**लातूर/प्रतिनिधी:** महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने लातूरच्या विलासराव देशमुख फाउंडेशनकडून विविध उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील वेगवेगळ्या भागात महिलांसाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र सुरु केले जात आहेत.

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील महालक्ष्मी मंदिर परिसर,राचट्टे गल्ली, गांधी चौक यासह परिसरातील महिलासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १६ चा शुभारंभ सोहळा ट्वेन्टी वन ॲग्रो लि.च्या संचालिका सौ.अदितीताई अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंगळवार,दि. १४ जुलै २०२६ रोजी दुपारी महालक्ष्मी मंदिर हॉल, महात्मा गांधी चौक,लातूर या ठिकाणी संपन्न झाला.

विलासराव देशमुख फाउंडेशन लातूरच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कौशल्य विकास उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सुरू करण्यात येणाऱ्या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रात महिलांना आधुनिक पद्धतीने शिलाईचे प्रशिक्षण देण्यात येणार असून,प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी देखील मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

या बोलताना ट्वेन्टी वन ॲग्रो लि.च्या संचालिका सौ.अदितीताई अमित देशमुख म्हणाल्या की, महिलांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी या कौशल्याचा उपयोग करून त्यांच्यामध्ये आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशन काम करत आहे हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात येत आहे. आज पर्यंत विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून ७००० पेक्षा अधिक महिलांना रोजगारभीमुख प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये शिलाई मशीन,ब्युटी पार्लर,इंग्लिश स्पोकन रिटेल सेल्स,बेड साइड असिस्टंट,केक तयार करणे अशा विविध कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

याचा लातूर शहरातील व परिसरातील महिलांना उपयोग होत आहे. त्याचबरोबर विलासराव देशमुख फाउंडेशन कडून व्ही.डी.एफ बाजार ही संकल्पना राबविण्यात येत आहे याच्या माध्यमातून शहरातील व शहरालगतच्या परिसरातील महिलांना एक हक्काची बाजारपेठ तयार करण्याचे काम विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून झाले आहे. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन गजानन बोयणे यांनी केले तर शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार बालाजी झिपरे यांनी मानले.

# हुतात्मा एक्सप्रेसची २५ गौरवशाली वर्षे पूर्ण

## सोलापूर आणि पुणे दरम्यानच्या या प्रतिष्ठित रेल्वे सेवेचा रौप्यमहोत्सव सोलापूर विभागाकडून साजरा होत आहे

**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग 'हुतात्मा एक्सप्रेस'चा रौप्यमहोत्सव अभिमानाने साजरा करत आहे; १५ जुलै २०२६ रोजी या गाडीच्या समर्पित सेवेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. १५ जुलै २००१ रोजी सुरू झाल्यापासून, ही गाडी विश्वसनीय संपर्क, प्रवाशांची सोय आणि प्रादेशिक प्रगतीचे प्रतीक बनली असून, तिने सोलापूर आणि पुणे येथील लोकांच्या हृदयात विशेष स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्रातील दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान जलद, आरामदायक आणि विश्वसनीय अशी दिवसा धावणारी रेल्वे सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेली हुतात्मा एक्सप्रेस गेल्या पाव शतकात केवळ एक 'गाडी' न राहता त्याहून अधिक काहीतरी बनली आहे. लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार वर्ग आणि पर्यटकांची ती एक विश्वासू सोबती ठरली आहे, तसेच या दोन शहरांमधील आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक



संबंध दृढ करण्यात तिने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

गाडी क्रमांक १२१५८ (सोलापूर-पुणे) आणि गाडी क्रमांक १२१५७ (पुणे-सोलापूर) म्हणून धावणारी हुतात्मा एक्सप्रेस सुमारे चार तासांत २६३ किलोमीटरचे अंतर कापते. ही गाडी कुर्डुवाडी आणि दौंड यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबते, ज्यामुळे संपूर्ण भागात अखंड संपर्क व्यवस्था उपलब्ध होते. सध्या ही गाडी १६ डब्यांसह (कोचेस) धावते; यात १ एसी चेअर कार, १ एसी ३-टायर इकॉनॉमी कोच, २ स्लीपर क्लास कोच आणि १० सेकंड क्लास सीटिंग कोच यांचा समावेश आहे. आराम आणि परवडणारे दर यांचा समतोल साधत समाजातील विविध घटकांतील प्रवाशांची ही गाडी सेवा करते.

हुतात्मा एक्सप्रेसला हे नाव सोलापूरच्या स्वातंत्र्यलढ्यातील चार अमर हुतात्म्यांच्या-जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, किसन सारडा आणि मल्लप्पा धनशेट्टी यांच्या स्मरणार्थ देण्यात आले आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे सर्वोच्च बलिदान आजही अनेक पिढ्यांना प्रेरणा देत आहे. सोलापूरच्या या शूर सुपुत्रांना दिलेली ही एक 'श्रद्धांजली'च आहे, जी त्यांची देशभक्ती आणि देशाप्रती असलेली अटळ निष्ठा यांची आठवण जिवंत ठेवते.

गेल्या २५ वर्षांत, हुतात्मा एक्सप्रेस ही सोलापूर-पुणे मार्गावरील सर्वात विश्वसनीय आणि पसंतीच्या रेल्वे सेवांपैकी एक बनली आहे. यामुळे दैनंदिन प्रवासास सुलभता आली आहे, व्यापार व वाणिज्य क्षेत्राला चालना मिळाली आहे, शैक्षणिक उपक्रमांना आधार मिळाला आहे, आरोग्यसेवेची उपलब्धता सुधारली आहे आणि पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले आहे; अशा प्रकारे या प्रदेशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात या गाडीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

'हुतात्मा एक्सप्रेस' आपल्या सेवेच्या २६ व्या वर्षात पदार्पण करत असताना, हा रौप्यमहोत्सव केवळ तिच्या कार्यकाळातील एक महत्त्वाचा टप्पाच नाही, तर रेल्वे आणि ती ज्या समाजाची सेवा करते, त्यांच्यातील दृढ बंधाचा उत्सवही आहे. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग प्रवाशांचा आराम, सुरक्षा आणि सेवेचा दर्जा अधिक सुधारण्यासाठी कटिबद्ध आहे. ही प्रतिष्ठित गाडी लोक, ठिकाणे आणि आकांक्षा यांना जोडण्याचा आपला अभिमानास्पद वारसा आगामी अनेक वर्षे असाच जपून ठेवेल, याची खात्री विभाग देत आहे.

# अवैध गांजा विक्रीवर छापा, ५२,५०० किमतीचा २ किलो १०० ग्रॅम गांजा जप्त



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरुद्ध पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशांवर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सातत्याने कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी दि. १४ जुलै २०२६ रोजी लातूर शहरातील कुष्ठधाम परिसरात नियोजनबद्ध छापा टाकून अवैध गांजा जप्त करण्याची कारवाई केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, विक्रम विनायक देडे (वय अंदाजे ३८ वर्षे, रा. कुष्ठधाम, लातूर) हा स्वतःच्या घरासमोर अवैधरित्या गांजाची विक्री करीत आहे. सदर माहितीची खात्री करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले. पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या आदेशानुसार कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून छापा टाकण्यात आला. नायब तहसीलदार, वैध मापनशास्त्र विभागाचे अधिकारी, अंगुली मुद्रा विभागाचा व्हिडिओग्राफर आणि राज्य परिवहन महामंडळाचे दोन शासकीय पंच यांना पाचारण करण्यात आले. संपूर्ण कारवाई व्हिडिओ चित्रीकरणासह पारदर्शक पद्धतीने करण्यात आली.

दुपारी सुमारे २.२० वाजता कुष्ठधाम, सारोळा रोड परिसरातील संशयिताच्या घरावर छापा टाकण्यात आला. यावेळी पोलिसांची चाहूल लागताच संशयित विक्रम देडे याने हातातील पांढऱ्या रंगाची पिशवी खाली टाकून घराच्या मागील बाजूने पळ काढला. पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये २ किलो १०० ग्रॅम वजनाचा बि-मिश्रित गांजा आढळून आला त्याची अंदाजे किंमत ५२,५०० असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी विक्रम विनायक देडे याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील कलम ८(क) व २०(ब)(ii)(ब) अन्वये पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा पोलीसांकडून कसून शोध सुरू आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली, पथकामधील पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव जगताप, पोलीस अमलदार साहेबराव हाके, अर्जुन राजपूत, रसूल पठाण, रियाज सौदागर, मोहन सुरवसे, प्रदीप स्वामी, मनोज खोसे, सचिन धारेकर , सुहास जाधव, गोविंद भोसले, प्रेम राठोड , बंडू नीटुरे, महिला पोलीस अमलदार सुरेखा मदने यांनी पार पाडली.

लातूर पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, अंमली पदार्थांची विक्री, साठा किंवा सेवनाबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास ती तात्काळ पोलीसांना कळवावी. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल. अंमली पदार्थमुक्त लातूरसाठी नागरिकांनी पोलीसांना सहकार्य करावे.

# ठाणे मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय



**लातूर/प्रतिनिधी :** ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीपाठोपाठ आता अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय चाणक्यनीतीचा करिष्मा दिसून आला आहे. वास्तविक ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत सहकार पॅनल विरुद्ध परिवर्तन पॅनल अशी लढत झाली असली, तरीही बहुजन विकास आघाडीचे बँकेवर वर्षानुवर्षे असणारे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांनी भाजपा आणि शिवसेना या दोन्हीही पक्षांचे उमेदवार दोन्ही पॅनलमध्ये उभे केले होते. या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे दोन्ही पॅनलमध्ये मिळून १४ उमेदवार निवडून आल्याने अध्यक्षपदावर कोणाचा उमेदवार निवडून येतो हे पाहणे रंजक ठरले होते. या रंजक राजकीय अंकानंतर झालेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे १४ तर बहुजन विकास आघाडीचे ७ उमेदवार यांनी मतदान केले. विशेष म्हणजे निवडणुकीतील पॅनलच्या माध्यमातून एकमेकांसमोर उभे ठाकलेले भाजपचे किसन कथोरे आणि कपिल पाटील या दोघांची अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मात्र एकजूट दिसून आली, हा रवींद्र चव्हाण यांच्या राजकीय प्रगल्भतेचा परिणाम असल्याचे सांगितले जात आहे. मात्र त्याचवेळी शिवसेनेचे एक मत फुटल्याने एकनाथ शिंदे यांना हादरा बसला आहे. थोडक्यात, या राजकीय नाट्यानंतर आता ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपद भाजपा-शिवसेना महायुतीकडे गेले आहे. अखेर बँकेच्या अध्यक्षपदी अरुण बाळू पाटील यांची तसेच उपाध्यक्ष पदी भाग्यश्री निलेश भोईर यांची निवड झाली आहे. बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व उलथवण्यात रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे या जोडीला यश आलं आहे.

# विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी अभाविप शिष्टमंडळाकडून विविध मंत्र्यांच्या भेटी!



**लातूर/प्रतिनिधी** :अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, महाराष्ट्र राज्याच्या वतीने राज्यातील विद्यार्थ्यांसमोरील विविध शैक्षणिक, तांत्रिक, वैद्यकीय, सामाजिक न्याय, कौशल्य विकास व आरोग्य क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांसंदर्भात राज्य शासनातील विविध मंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षण मंत्री मा. दादाजी भुसे, राज्यमंत्री मा. पंकज भोयर, वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. हसन मुश्रीफ, राज्यमंत्री मा. माधुरी मिसाळ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मा. मेघना बोर्डीकर, सामाजिक न्याय मंत्री मा. संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री मा. अतुल सावे तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मा. मंगलप्रभात लोढा यांना विविध विभागांशी संबंधित निवेदने सादर करण्यात आली.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे विद्यापीठांच्या परीक्षा व निकाल वेळेत जाहीर करणे, उएढ प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करणे, मुलींच्या मोफत शिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी, खासगी विद्यापीठांच्या शुल्कावर नियंत्रण, प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे, नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमांना शिष्यवृत्तीचा लाभ, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, खुल्या छात्रसंघ निवडणुका तसेच तंत्रशिक्षणातील संशोधन, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संबंधित विविध प्रश्न आणि शिष्यवृत्ती वेळेत वितरित करण्याची मागणी करण्यात आली. शालेय शिक्षण विभागाकडे शिक्षक भरती तातडीने पूर्ण करणे, TET-T-IT परीक्षा नियमित घेणे, पेपरफुटी रोखण्यासाठी सक्षम परीक्षा यंत्रणा उभारणे, अकरावी प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे, ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करणे, शासकीय व मराठी माध्यमाच्या शाळांचे सक्षमीकरण, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळणे तसेच मानसिक आरोग्य व करिअर मार्गदर्शन व्यवस्था मजबूत करण्याची मागणी करण्यात आली.

वैद्यकीय शिक्षण विभागासमोर वैद्यकीय परीक्षा शुल्कवाढीवर नियंत्रण, उझड विद्यार्थ्यांचा अंतिम परीक्षेचा प्रश्न सोडविणे, खासगी महाविद्यालयांमध्ये इंटर्नना शासननिर्धारित स्टायपेंड लागू करणे, पायाभूत सुविधा वाढविणे, निवासी डॉक्टरांच्या कामाच्या अटी सुधारणे, पॅरामेडिकल विद्यार्थ्यांच्या नोंदणी प्रक्रियेला कालमर्यादा निश्चित करणे, रॅगिंगमुक्त वातावरण निर्माण करणे तसेच ग्रामीण सेवा (इेपव) धोरण अधिक पारदर्शक करण्याची मागणी करण्यात आली.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडे रिक्त पदे भरणे, ग्रामीण सेवा धोरण सुसंगत करणे, डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना, ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्य सेवा सक्षम करणे, आवश्यक औषधे व उपकरणे उपलब्ध करून देणे तसेच आयुष पदवीधरांसाठी राखीव पदांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

सामाजिक न्याय विभागाकडे शासकीय वसतिगृहांची उभारणी, चरहरउ्इढ पोर्टलमधील तांत्रिक अडचणी दूर करणे, शिष्यवृत्ती वेळेत वितरित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर परदेश शिष्यवृत्तीच्या जागा वाढविणे, स्वाधार योजनेची रक्कम नियमित वितरित करणे, मुलींच्या वसतिगृहांमध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करणे, BARTI फेलोशिपच्या जागा वाढविणे तसेच समाजकार्य (BSW/MSW) पात्रतेला पुन्हा प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली. इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व शुल्क परताव्याचे वेळेत वितरण, नवीन वसतिगृहांची उभारणी, आधार योजनांचा लाभ नियमित देणे, परदेश शिष्यवृत्ती प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे, स्पॉट राऊंडद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी शासन निर्णय जारी करणे तसेच सर्व योजनांसाठी कालबद्ध कार्यपद्धती लागू करण्याची मागणी करण्यात आली.

कौशल्य विकास विभागाकडे आयटीआयमध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणे, कार्यशाळा व प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण, रिक्त पदे भरणे, आयटीआय विद्यार्थ्यांना बारावी समकक्ष दर्जा देणे, उद्योगांशी समन्वय वाढविणे, शिष्यवृत्ती व उ्इढ लाभ वेळेत देणे, वसतिगृह सुविधा वाढविणे तसेच विद्यार्थिनींसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी सर्व संबंधित मंत्र्यांनी अभाविपने मांडलेल्या मागण्यांची सकारात्मक दखल घेत संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक आयोजित करून प्रत्येक विषयावर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या शिष्टमंडळामध्ये अभाविप पश्चिम महाराष्ट्र प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी, देवगिरी प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नावरे, विदर्भ प्रदेश मंत्री देवाशिष गोतरकर, कोंकण प्रदेश सहमंत्री आशी गुप्ता, मुंबई महानगर मंत्री प्रशांत माळी तसेच राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मैत्रेयी खेडकर यांचा समावेश होता.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संबंधित प्रत्येक विभागाच्या मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ठोस आणि तथ्याधारित भूमिका मांडली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न तातडीने मार्गी लागावेत, यासाठी शासनासमोर स्पष्ट मागण्या मांडण्यात आल्या. सर्व मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर बैठक घेऊन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र, अभाविप केवळ आश्वासनांवर थांबणार नाही. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नावर कालबद्ध कार्यवाही होणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रिया, परीक्षा, वसतिगृहे, शिक्षक भरती, वैद्यकीय शिक्षण आणि कौशल्य विकासाशी संबंधित प्रश्न प्रत्यक्ष सुटेपर्यंत अभाविप शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करेल आणि गरज पडल्यास राज्यभर तीव्र आंदोलनही उभारेल. अशी प्रतिक्रिया प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे यांनी व्यक्त केली आहे.

# लातूरमध्ये टाईप-१ मधुमेहग्रस्तांसाठी विशेष कार्यशाळा




**लातूर/प्रतिनिधी :** आरएसएसडीआय महाराष्ट्र चॅप्टर व इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी रोडवरील हॉटेल ग्रँड पोर्टिको येथे टाईप-१ मधुमेहग्रस्त व्यक्तींसाठी विशेष कार्यशाळा तसेच मधुमेह व लठ्ठपणा या विषयावरील एकदिवसीय वैद्यकीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ग्रामीण भागातील ६० गरजू टाईप-१ मधुमेहग्रस्त मुला-मुलींना अत्याधुनिक सीजीएमएस (सतत ग्लुकोज निरीक्षण प्रणाली) मशीन मोफत बसविण्यात आली. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शरीरातील रक्तातील साखरेची पातळी २४ तास, वारंवार बोटाला टोचणी न लावता मोजता येते. त्यामुळे रुग्णांना आहार आणि इन्सुलिनच्या डोसचे योग्य नियोजन करता येते. कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी टाईप-१ मधुमेहग्रस्त रुग्ण व त्यांच्या पालकांच्या विविध शंकांचे निरसन करून आधुनिक उपचारपद्धती व जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर मधुमेह व लठ्ठपणा या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय परिषदेत लातूर व परिसरातील सुमारे ५०० डॉक्टरांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार मा. डॉ. शिवाजी काळगे उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. जी. आर. भराडिया, डॉ. अजय जाधव आणि डॉ. रमेश भराटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या परिषदेत मुंबईचे सुप्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. विजय पनीकर, डॉ. विजय नेगलूर, डॉ. संहिता वालावळकर, डॉ. मनोज चावला, डॉ. राजीव कोविल, डॉ. पूर्वी चावला, डॉ. निखिल नाशिककर, डॉ. व्यंकटेश शिवणे, डॉ. स्नेहल तन्ना, पुण्याचे डॉ. सुहास एरंडे, छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. अर्चना सारडा व डॉ. मयुरा काळे, नाशिकचे डॉ. नारायण देवगावकर, नांदेडचे डॉ. समीर चंद्रात्रे व डॉ. संतोष मालपाणी (अध्यक्ष, महा-आरएसएसडीआय ), सोलापूरचे डॉ. भास्कर पाटील व डॉ. अनिकेत इनामदार, साताऱ्याचे डॉ. जयदीप रेवले, कोल्हापूरचे डॉ. राजेश देशमाने व डॉ. अदिती देशमाने, रत्नागिरीचे डॉ. अनिरुद्ध फडके तसेच लातूरचे डॉ. विजय ढवळे आणि डॉ. रामदास बरूरे यांनी मधुमेह व्यवस्थापन, लठ्ठपणा नियंत्रण आणि आधुनिक उपचारपद्धतींवर सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. चंद्रशेखर अष्टेकर (उपाध्यक्ष, महा-आरएसएसडीआय ), डॉ. चांद पटेल, डॉ. प्रदीप नागुरे, डॉ. निखिल दरक तसेच आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, डॉ. श्वेता काटकर आणि डॉ. आकांक्षा त्रिपाठी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बालाजी पुरी, डॉ. श्याम तोष्णीवाल, डॉ. प्रदीप इंदलकर, डॉ. शीतल पाटील, डॉ. स्नेहल शिवपुजे, डॉ. शीतल सोमाणी, डॉ. अभिजित यादव, डॉ. अमोल शेकडे, डॉ. चेतन सारडा, सदानंद कांबळे, डॉ. किरण डावळे, डॉ. ओमप्रकाश भोसले, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. शिरीष पाटील आणि डॉ. महेश शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

ग्रामीण भागातील टाईप-१ मधुमेहग्रस्तांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, त्यांचे जीवनमान उंचावणे आणि वैद्यकीय क्षेत्रातील नव्या संशोधनाची माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

# ‘बीएलओ’ कामाच्या सक्तीविरोधात अंगणवाडी सेविकांचा तीव्र एल्गार
## लोहारा तहसीलसमोर धरणे; आदेश रद्द करण्याची मागणी



लोहारा (प्रतिनिधी)-विशेष सखोल संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत सहाय्यक बीएलओची खातेबाह्य कामे अंगणवाडी सेविका व मदतनीसांना सक्तीने दिल्याच्या निषेधार्थ सोमवारी (दि. १३) लोहारा तहसील कार्यालयासमोर अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी धरणे आंदोलन करत तीव्र निदर्शने केली. तालुक्यातील मोठ्या संख्येने अंगणवाडी कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले होते.

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवानराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. नायब तहसीलदार रतन काजळे यांनी निवेदन स्वीकारले.

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, अंगणवाडी सेविका व मदतनीस या एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत बालकांचे पोषण, आरोग्य तपासणी, लसीकरण तसेच पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडतात. त्यांच्यावर अतिरिक्त खातेबाह्य कामे सोपवल्यास मूळ कामांवर परिणाम होऊन लाभार्थ्यांना त्याचा फटका बसू शकतो.भारत सरकार तसेच राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या सूचनांनुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना योजनेशी संबंधित नसलेली कामे देऊ नयेत, असे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. लोहारा तहसील कार्यालयाकडून अंगणवाडी सेविकांना सहाय्यक बीएलओ म्हणून नियुक्तीचे आदेश देण्यात आल्याचा आरोप करत हे आदेश तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी उपसभापती अमोल पाटील, दादासाहेब जानकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन माहिती घेतली व पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. मागणी मान्य न झाल्यास जिल्हाभर व राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दिला.

आदेश रद्द करण्याची केली मागणी अंगणवाडी सेविकांना सहाय्यक बीएलओ म्हणून देण्यात आलेली नियुक्ती रद्द करावी, अशी मागणी आंदोलनादरम्यान करण्यात आली. मतदार यादी पुनरीक्षणाचे काम हे अंगणवाडी योजनेशी संबंधित नसल्याने ते देणे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या विरोधात असल्याचे संघटनेने म्हटले आहे. शासनाने याची तातडीने दखल घेऊन आदेश मागे घ्यावेत, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# हिरवळीची घोषणा की फक्त कागदोपत्री हरित क्रांती?
## ३५ लाख रोपे तयार... पण जगणार किती? जनतेच्या मनात प्रश्नांचा वनवा!

धाराशिव(रामेश्वर डोंगरे)- सामाजिक वनीकरण विभागाने हरित धाराशिव अभियान २०२५ अंतर्गत तब्बल ३५ लाखांहून अधिक रोपांची निर्मिती केल्याचा दावा केला आहे. ६० पेक्षा अधिक स्थानिक व दुर्मिळ वृक्षप्रजातींचा समावेश, १९ रोपवाटिका, स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर आणि नागरिकांना मोठ्या प्रमाणावर सहभागाचे आवाहन अशा अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. कागदावर सर्व काही हिरवेगार दिसत असले तरी जनतेच्या मनात मात्र एकच प्रश्न घोंगावत आहे...

**रोपे तयार झाली... पण ती जगणार तरी किती?**

धाराशिवसह मराठवाड्यात दरवर्षी कोट्यवधी रुपयांची वृक्षलागवड केली जाते. लाखो रोपे लावल्याचा दावा होतो. फोटोसेशन होते, उद्घाटने होतात, अहवाल तयार होतात. पण दोन-तीन महिन्यांनी त्या रोपांची अवस्था काय असते? पाणी नसल्याने, संरक्षण नसल्याने आणि देखभाल न झाल्याने हजारो रोपे सुकून जातात. मग पुन्हा पुढच्या वर्षी नव्याने आकडेवारीचा खेळ सुरू होतो.

सर्वात मोठा प्रश्न - पाण्याचे नियोजन आहे का?

रोपे तयार करणे हे पहिले पाऊल आहे. खरी परीक्षा त्यानंतर सुरू होते.

प्रत्येक रोपाला नियमित पाणी मिळणार का?

टँकर, ठिबक किंवा जलसंधारणाचे नियोजन झाले आहे का?

जनावरे, आगी आणि अतिक्रमणापासून संरक्षणाची व्यवस्था आहे का?

रोपे लावल्यानंतर त्यांचे तीन वर्षे संगोपन कोण करणार?

की वृक्षलागवड फक्त छायाचित्रांपुरतीच मर्यादित राहणार?

हे प्रश्न आता जनतेकडून उपस्थित होत आहेत.

हिरवळ घोषणेत नाही, तर जगलेल्या झाडांत दिसली पाहिजे

सामाजिक वनीकरण विभागाने स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार रोपे तयार केल्याचा दावा स्वागतार्ह आहे. मात्र यशाचे मोजमाप रोपे तयार करण्यात नसून ती मोठी झाडे होईपर्यंत जिवंत ठेवण्यात आहे. लाखो रोपे लावल्याच्या बातम्यांपेक्षा तीन वर्षांनी किती झाडे उभी आहेत, याचा लेखाजोखा जनतेसमोर ठेवण्याची वेळ आली आहे. .

# कळंब बसस्थानक परिसरात कापसे यांच्या हस्ते वृक्षारोपण !

कळंब (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी (दि. १४) कळंब येथील बसस्थानक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे व आगार प्रमुख विजयकुमार घोलप ,प्रवासी मित्र संघटनेचे प्रा . मोहन जाधव यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कळंब आगार , बसस्थानक , येरमाळा स्थानक , शिराढोण स्थानक या परिसरात जवळपास दोनशे झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले . हरित भविष्यासाठी एक पाऊल पुढे या संकल्पनेतून राज्यातील बसस्थानके,

आगार (डेपो) आणि विभागीय कार्यालय परिसरातील सुमारे १ हजार ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याच राज्यव्यापी मोहिमेचा एक भाग

म्हणून कळंब त्या संलग्न असणारे शिराढोण आणि येरमाळा बसस्थानक परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले याप्रसंगी वाहतूक नियंत्रक एस . व्ही . सारुक , सुशील हुंबे गोविंद जाधवर ,चेतन गोसावी, प्रभाकर झांबरे ,विलास जाधव, चंद्रकांत चौरे , स्थानक प्रमुख बालाजी मुळे ,रामलिंग जाधवर ,अलका भोसले यांच्यासह राज्य परिवहन महामंडळातील अनेक कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून हा कार्यक्रम संपन्न करण्यात आला .


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708

9284321472


# धाराशिव शहर प्लास्टिकच्या विळख्यात; स्वच्छतेच्या घोषणा कागदावरच?
## नगरपालिकेचा ‘बेस्ट टू वेस्ट’ फक्त कार्यक्रमापुरताच की शहरभर कचऱ्याचे साम्राज्य?

धाराशिव(रामेश्वर डोंगरे)-शहरात स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकमुक्तीच्या घोषणा मोठ्या उत्साहात केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग, उघड्यावर पडलेला ओला-सुका कचरा आणि बंदी असलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा सर्रास वापर सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या कारभारावर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

लातूर येथे शाहू कॉलेजच्या एनसीसी विभागाने राबविलेल्या बेस्ट टू वेस्ट उपक्रमातून कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकमुक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी बाजारपेठेत जाऊन व्यापारी व नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

परंतु धाराशिवमध्येही अशाच प्रकारचे उपक्रम केवळ छायाचित्रापुरते न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीत दिसायला हवेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ, भाजी मंडई, चौक, सार्वजनिक ठिकाणे आणि नाल्यांमध्ये प्लास्टिकचा कचरा मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. पावसाळ्यात याच प्लास्टिकमुळे गटारे तुंबतात, सांडपाणी रस्त्यावर येते आणि डासांचे प्रमाण वाढून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो.

नगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमा नेमक्या किती प्रभावी आहेत?

प्लास्टिक बंदीची कारवाई केवळ कागदावरच आहे का? व्यापाऱ्यांवर किती दंडात्मक कारवाई झाली? कचऱ्याचे शास्त्रोक्त वर्गीकरण आणि पुनर्वापराची व्यवस्था नेमकी कुठे आहे?

असे अनेक प्रश्न आता धाराशिवकर विचारू लागले आहेत.

पर्यावरण वाचविण्यासाठी केवळ भाषणे आणि फलक नव्हे, तर सातत्यपूर्ण जनजागृती, कठोर अंमलबजावणी आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. नगरपालिकेने शाळा, महाविद्यालये, व्यापारी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने नियमित स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिकमुक्त धाराशिवचे उद्दिष्ट प्रत्यक्षात उतरवावे, अशी जनतेची मागणी आहे.

स्वच्छ शहराची सुरुवात प्रत्येक नागरिकापासून होते; मात्र त्यासाठी प्रशासनाची इच्छाशक्तीही तितकीच महत्त्वाची आहे.

# उमरग्यात माशा-डासांचा प्रादुर्भाव; संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला



उमरगा(प्रतिनिधी)-सध्या सुरू असलेल्या पावसाळी व दमट हवामानामुळे उमरगा शहरात माशा व डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक प्रभागांतील गटारे तुंबल्याने तसेच ठिकठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाल्याची भीती वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

गेल्या चार-पाच दिवसांपासून शहरासह ग्रामीण भागात ढगाळ व दमट वातावरण कायम आहे. अनेक भागांतील अस्वच्छता, तुंबलेल्या गटारी आणि साचलेले पाणी यामुळे ’स्वच्छ शहर, सुंदर शहर’ ही संकल्पना केवळ कागदावरच असल्याचे चित्र दिसून येत आहे. दिवसभर उष्णता व रात्री दमट हवामानामुळे माशा आणि डासांचा त्रास नागरिकांना मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, या परिस्थितीमुळे विषमज्वर, टायफॉइड, कावीळ, गॅस्ट्रो, ताप, उलट्या आदी संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी उघड्यावरचे अन्नपदार्थ खाणे टाळावे, अन्नपदार्थ व पालेभाज्या झाकून ठेवाव्यात आणि वैयक्तिक स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

नागरिकांनी पावसाळ्यात नियमित किटकनाशक फॉगिंग, डास प्रतिबंधक औषधांची फवारणी, गटारे व नाल्यांची स्वच्छता आणि कचरा उचलण्याची दैनंदिन व्यवस्था करण्याची मागणी नगरपालिकेकडे केली आहे. तसेच स्वच्छता व आरोग्य जनजागृती मोहीम राबवून संवेदनशील भागांची तातडीने पाहणी करण्याचीही अपेक्षा व्यक्त केली आहे. माशा घालवण्यासाठी घरगुती उपाय : माशांचा त्रास कमी करण्यासाठी आले, तुळस आणि मिरे यांचा काढा तयार करून तो स्प्रेच्या बाटलीत भरून घराच्या कोपऱ्यांत फवारणी करावी. घराच्या परिसरात गवती चहाची लागवड केल्यास त्याच्या सुगंधामुळे माशा कमी प्रमाणात येतात. तसेच पंखा किंवा कुलर सुरू ठेवल्यास हवेच्या प्रवाहामुळेही माशांचा त्रास कमी होण्यास मदत होते.

पालिकेने तातडीने करावयाची कामे शहरातील सर्व नाले व गटारींची तातडीने स्वच्छता करावी, साचलेल्या पाण्याचा त्वरित निचरा करावा, नियमितपणे फॉगिंग तसेच डासप्रतिबंधक औषधांची फवारणी करावी, कचरा उचलण्याची दैनंदिन व्यवस्था प्रभावीपणे राबवावी, स्वच्छता व आरोग्य जनजागृती मोहीम राबवावी आणि संवेदनशील भागांची विशेष पाहणी करून तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६

२) रक्तपेढी २२३९७६

३) जिल्हा रुग्णालय २२६९२७

४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९

५) अग्नीशामक विभाग २२२१०१

६) रेल्वेस्टेशन २४०९९९

७) एसपी कार्यालय २२७६२०

८) जिल्हाधिकारी का.२२४५०१

९) तहसिल का. २२७८८२

१०) जि.प. २२५४०७

११)नगरपरिषद २२५४०७

१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४

१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६

१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २

१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८

१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७

१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४

१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५

१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४

२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६

२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६

२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२

बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११

२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०

२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२

२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८

२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३

२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०

२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२

२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# शेतकऱ्याचा मुलगा नको... मग उद्याचा शेतकरी कुठून येणार?
## लग्नाचा प्रश्न गंभीर; कृषिमंत्र्यांपर्यंत पोहोचली शेतकरी तरुणांची व्यथा




धाराशिव(रामेश्वर डोंगरे)-राज्यातील ग्रामीण भागात आज एक अत्यंत ज्वलंत आणि वेदनादायी वास्तव समोर आले आहे. शेतकऱ्यांच्या मुलांच्या लग्नाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून अनेक सुशिक्षित, कष्टाळू आणि स्वाभिमानी शेतकरी तरुण वयाच्या तिशी-चाळिशीत पोहोचूनही अविवाहित आहेत. नुकतीच काही तरुणांनी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची भेट घेऊन ही वेदना मांडली. मात्र हा प्रश्न केवळ एका भेटीपुरता नसून संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक व्यवस्थेला हादरा देणारा आहे.

आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, मुलगा शेतकरी आहे एवढे ऐकताच अनेक मुलींचे पालक नकार देतात. शेतकऱ्याच्या घरी मुलीला भरपूर काम करावे लागेल, आर्थिक स्थैर्य नसेल, शेतीवर अवलंबून आयुष्य अनिश्चित असेल, या भीतीमुळे अनेक नाती येण्याआधीच मोडतात. अनेक मुलीही सरकारी किंवा खासगी नोकरी करणारा वर पसंत करतात; पण शेती करणारा मुलगा नको, अशी मानसिकता वाढत चालली आहे.

यामागे केवळ विवाहाचा प्रश्न नाही, तर शेतीकडे समाजाने पाहण्याचा दृष्टिकोनही जबाबदार आहे. वाढते उत्पादन खर्च, बनावट बियाणे, निकृष्ट खते, हवामानातील अनिश्चितता, कर्जाचा बोजा आणि शेतीमालाला न मिळणारा हमीभाव यामुळे शेतकरी आधीच संकटात आहे. त्यात आता संसार उभा करण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

आज जर प्रत्येक मुलीने आणि तिच्या कुटुंबाने शेतकरी नको, नोकरदारच हवा असा हट्ट धरला, तर उद्या शेती करणार कोण? देशाच्या अन्नसुरक्षेची जबाबदारी कोण उचलणार? प्रत्येक जण नोकरीकडे वळला, तर अन्नधान्याचे उत्पादन कोण करणार? हा प्रश्न आता प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

समाजात शेतकऱ्याबद्दल आदराच्या गप्पा मारल्या जातात; पण लग्नाचा विषय आला की शेतकरी दुय्यम ठरतो. अन्नदाता म्हणून गौरव करणारा समाज त्याच अन्नदात्याच्या मुलाला जावई म्हणून स्वीकारायला तयार नाही, ही शोकांतिका आहे.

सरकारने शेतकरी कुटुंबांचे आर्थिक बळकटीकरण, शेतीला स्थैर्य, ग्रामीण रोजगार, विवाह समुपदेशन आणि सामाजिक जनजागृती यासाठी ठोस धोरण आखण्याची गरज आहे. समाजानेही शेतकरी हा कमीपणाचा नव्हे, तर अभिमानाचा व्यवसाय आहे, हा विचार स्वीकारण्याची वेळ आली आहे.

आजचा प्रश्न फक्त शेतकऱ्याच्या मुलाच्या लग्नाचा नाही... तो उद्याच्या भारताच्या अन्नसुरक्षेचा आणि शेतीच्या भवितव्याचा आहे.

शेतकरी वाचला तरच देश वाचेल; पण शेतकऱ्यालाच समाजाने नाकारले, तर उद्याचा शेतकरी निर्माण होणार कसा? - हा प्रश्न आता शासनासह संपूर्ण समाजासमोर उभा आहे


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649